**पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८.**

**मा.क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- ११**

**स भा वृ त्तां त**

**दिनांक ४-१-२०१७** **वेळ-दुपारी ३.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.४/१/२०१७ रोजी **दुपारी ३.००** वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा.शितोळे शैलजा बाबुराव** **सभापती**
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.कदम सदगुरु महादेव
४) मा.कैलास महादेव कदम
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.जम सोनाली पोपट
७) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
८) मा.मोटे किरण बाळासाहेब
९) मा.संजय केशवराव काटे
१०)मा.गणेश आनंदराव ढोरे स्विकृत सदस्य
११)मा.हमीद नवाब शेख स्विकृत सदस्य

याशिवाय मा.अण्णा बोदडे - क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय घुबे -कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.शशिकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.शिंदे- उपअभियंता, मा.वायकर- उपअभियंता,मा.सोनवणे-उपअभियंता विदयुत, मा.दिलीप धुमाळ- उपअभियंता विदयुत, मा.जावळे- उपअभियंता पापु,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, मा.उगले-लेखाधिकारी, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालीलप्रमाणे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) प्रभाग क्र. ४१ गांधीनगर मधील चौक व रस्त्यास नांव देण्याबाबत-मा.कैलास कदम,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र. ४० खराळवाडी बालभवन हॉलमधील सभागृहास नांव देण्याबाबत- मा.कैलास कदम,मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) दापोडीमध्ये ठिकठिकाणी चौकामध्ये सुशोभिकरण करणे शिल्प बसवणे- मा.रमा ओव्हाळ,मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) नामकरणाबाबत - मा.सुषमा तनपुरे, मा. सोनाली जम यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ५) प्रभाग क्र.६२ दापोडी गणेशनगर येथील रेल्वे उड्डाणपुलाखालील ( ROB) मोकळी जागा पार्किंगकरीता नाममात्र शुल्क आकारुन भाडे करार तत्वावर देणेबाबत- मा. सोनाली जम व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ६) नामकरण करणेबाबत-मा. सदगुरु कदम व मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ७) प्रभाग क्र.६३ कासारवाडी मधील हिंदवी चौक येथे संडास ब्लॉक टाईल्स बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे व प्रभाग क्र.६३ कासारवाडी स्मशानभूमी रंगरंगोटी व स्थापत्य विषयक कामे करणेच्या कामांच्या स्वरुपात बदल करणेबाबत- मा.किरण मोटे, मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा.किरण मोटे अनुमोदक-मा.संजय काटे

सन्मा.सदस्य श्री.जितेंद्र ननवरे यांचे वडील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब ननवरे यांचे दु:खद निधन झाले असलेने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली

----

मा.सभापती- श्रध्दांजली अर्पण करणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

-----

अ) दिनांक २/११/२०१६ व दि.७/१२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि.७/१२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१०) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक- २१८ विषय क्रमांक -१

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा.कैलास कदम अनुमोदक-मा.सदगुरु कदम

संदर्भ- मा. कैलास कदम, मा. सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ४१ गांधीनगर प्रभागातील नाणेकर चाळ येथील चौकास व रस्त्यांस खालील नांव देणेस मान्यता देणेत येत आहे.

१) क्रोमा कडुन बीफ मार्केट व नाणेकर चाळकडे येणा-या रस्त्यास "**हाजी अहमद चाँदमिया कुरेशी मार्ग**"

**२)** क्रोमा कडुन बीफ मार्केटकडे येणा-या चौकास "**भारतरत्न राष्ट्रपती डॉ.ए पी जे अब्दुल कलाम चौक**"

**३)** नाणेकर चाळ मधील गोकुळ हॉटेल समोरील जाणा-या रस्त्यास "**कै.शंकरराव नारायण साठे मार्ग**"

४) गोकुळ हॉटेल कडुन पिंपरी रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यास "**कै.राजकुमार दामोदर सुखवाणी मार्ग**" सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- २१९ विषय क्रमांक -२

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा. कैलास कदम

संदर्भ-, मा.सदगुरु कदम, मा. कैलास कदम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ४० खराळवाडी बालभवन हॉल मधील सभागृहास खालील नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**१)** खराळवाडी येथील बालभवन हॉल मधील सभागृहास "**भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद बालभवन**"

२) पिंपरीकडुन नेहरुनगरकडे जाणाऱ्या चौकास "**जय संतोषी माता चौक**" सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- २२० विषय क्रमांक -३

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. रमा ओव्हाळ अनुमोदक-मा. सोनाली जम

संदर्भ-, मा.रमा ओव्हाळ, मा. सोनाली जम यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ६१ दापोडी मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोरील चौकात सुशोभिकरण करुन त्याठिकाणी महाकारुणी तथागत भगवान गौतम बुध्द यांची हस्तमुद्राचे शिल्प बसवणेत यावे व दापोडीतील येणा-या सर्व चौकात सुशोभिकरण व विविध प्रकारचे शिल्प बसवणेत यावे.त्यासाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात तरतुद करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य

------

ठराव क्रमांक- २२१ विषय क्रमांक -४

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक-मा. सोनाली जम

संदर्भ-, मा.सुषमा तनपुरे, मा. सोनाली जम यांचा प्रस्ताव.

सांगवी गंगानगर येथील चौकाचे नामकरण **"कै.निवृत्ती कोंडिबा ढोरे पाटील चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य

----

ठराव क्रमांक- २२२ विषय क्रमांक -५

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. सोनाली जम अनुमोदक-मा. सुषमा तनपुरे

संदर्भ- मा. सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ दापोडी गणेशनगर याठिकाणी ख्रिस्ती समाज बांधव विनियार्ड वर्क्स चर्च असून साधारणत: दहा ते पंधरा हजार ख्रिस्ती बांधव दर आठवडयास शनिवार,रविवार तसेच गुरुवार या दिवशी प्रार्थनेकरीता विविध भागातून येत असतात. सदर ठिकाणी वाहनांसाठी कुठल्याही प्रकारची पार्किंगची व्यवस्था नसल्याने येणारे सर्व नागरीक रस्त्याच्या कडेस त्याचप्रमाणे सोसायटीच्या गेटसमोर वाहने लावीत असतात. त्यामुळे येथील नागरीकांना वाहतुकीस अडथळा तसेच पार्किंगचा त्रास हा नेहमीच होत असतो.

तरी सदर प्रार्थनेकरीता नागरीकांसाठी पार्किंगची सोय म्हणुन दापोडी गणेशनगर येथील रेल्वे उड्डाणपुलाखालील **(ROB**) मोकळी जागा पार्किंगकरीता नाममात्र शुल्क आकारुन भाडे करार तत्वावर देण्यात यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- २२३ विषय क्रमांक -६

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक-मा. किरण मोटे

संदर्भ- मा. सदगुरु कदम, मा. किरण मोटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३२ मधील मो.जा.क्र. ५० येथे होणा-या बहुउद्देशिय हॉलला **"बाबा ननावरे"** असे नांव देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- २२४ विषय क्रमांक -७

दिनांक- ४/१/२०१७ विभाग-

सुचक- मा. किरण मोटे अनुमोदक-मा. जितेंद्र ननवरे

संदर्भ- मा. किरण मोटे, जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६३ कासारवाडी मधील हिंदवी चौक येथे संडास ब्लॉक टाईल्स बसविणे व स्थापत्य विषयक कामे करणे व प्रभाग क्र.६३ कासारवाडी स्मशानभूमी रंगरंगोटी व स्थापत्य विषयक कामे करणेच्या कामांची निविदा होऊन कार्यादेश मिळाला आहे. निविदा क्र.अनुक्रमे १/९/२०१६-१७ व २६/१७/२०१६-१७ असे आहेत. स्मशानभूमीचे नवीन काम चालू होणार असल्यामुळे निविदा क्र. २६/१७/२०१६-१७ चे काम हे वॉर्डात किरकोळ दुरुस्तीच्या कामासाठी व निविदा क्र.१/९/२०१६-१७ चे ही काम वॉर्डातील किरकोळ कामे करणेसाठी करणार आहे.वरील निविदेच्या कामाच्या स्वरुपात व कामाच्या ठिकाणात बदल होणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-

**(मा.शितोळे शैलजा बाबुराव)**

सभापती- क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/ १०८/२०१७

दिनांक- १२/१/२०१७



प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.